क्रमांक/यजिप पापुवि/ सभा/वशि/ ४३५ /१४
६/६/२०१४

पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

यवतमाळ, दिनांक :-

**प्रति,**

सन्मा. श्री. / श्रीमती ---------------------------------------------------------

मु. -------------------------------- पो. -----------------------------------

ता. -------------------------------जिल्हा ----------------------------------

सदस्य जलव्यवस्थापन व स्वच्छता समीती

ooooo

दिनांक १३.०५.२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचा अहवाल आपले माहीती करीता पाठविण्यात येत आहे.

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अति मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

# अंडर पोष्टींग ऑफ सर्टिफीकेट

८९४
क्रमांक/यजिप पापुवि/ सभा/वशि/ /१४
पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
यवतमाळ, दिनांक :- 3/6/2014

**नमुना - अ**

याव्दारे जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीचे सन्माननिय सदस्य श्री./ श्रीमती ---------------------------------------------- मु. ---------- पो. -------------- ता.------------ जिल्हा यवतमाळ यांना सभेची नोटीस देण्यात येते की , जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची सभा दिनांक ११.०६.२०१४ बुधवार रोजी दुपारी २.०० वाजता जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमधील स्थायी समिती सभागृहात जोडपत्रात उल्लेखीलेले कामकाज चालविण्याकरीता भरविण्यात येणार आहे. आपणास सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

सभेचे स्थळ :- **स्थायी समिती सभागृह**
**जि.प. प्रशासकीय इमारत यवतमाळ**

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अति मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद यवतमाळ** करीता

**नमुना "अ" चे जोडपत्र**

**दिनांक ११.०६.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. जलव्यवस्थापण व स्वच्छता समितीचे सभेत चर्चेस यावयाचे विषय**

विषय क्र. १ :- दिनांक १३.०५.२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे इतिवृत्तास मान्यता देणे.
विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करण्याबाबत कार्यवाहीचा आढावा.
विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाअंतर्गत कामाचा आढावा.
विषय क्र. ४ :- संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत कामाचा आढावा.
विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा
विषय क्र. ६ :- राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकमां अंतर्गत कामाचा आढावा.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अति मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद यवतमाळ** करीता

## दि. १३/०५/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे

## इतिवृत्त

दिनांक १३.०५.२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा.अध्यक्ष जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

1. मा. श्री. प्रविणभाऊ देशमुख, अध्यक्ष जिल्हा परिषद यवतमाळ
2. मा. श्री. प्रभाकरभाऊ उईके सभापती समाज कल्याण जि.प. यवतमाळ
3. सन्मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सदस्य जिल्हा परिषद यवतमाळ
4. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ
5. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. के.एम. मानकर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
२. श्री. कैझर हुसैन सहा. भुवैज्ञानिक पाणी पुरवठ विभाग जि.प. यवतमाळ
३. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
४. श्री. डी. एम. डोंगरे उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग राळेगाव
५. श्री. ए.टी. पदमावार उपअभियंता जि.प. पाणी पुरवठा उपविभाग पुसद
६. श्री. व्ही.जे. वाल्दे व. भु. वैज्ञानिक यवतमाळ
७. श्री. व्ही.जी. देशमुख य.म.प्र.वि. यवतमाळ
८. श्री. संजय वानखडे नरेगा कक्ष
९. श्री. आर.बी. भगत शा.अ. नरेगा
१०. श्री. शे.मा. दारव्हेकर उपअभियंता म.जी.प्रा. यवतमाळ
११. श्री. प्रशांत चुंबळे कृषी विभाग प्रतिनिधी
१२. श्री. नितीन शहाडे क.अभि. पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१३. श्री. आर.के. पवार यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
१४. श्री. ए.एल. निमजे शा.अ. पाटबंधारे विभाग यवतमाळ
१५. श्री. अ.ना. निसाळ सिंचन विभाग जि.प. यवतमाळ
१६. श्री. रामदास शिरसाठ जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ
१७. श्री. वाय.डी. उमरे क.अ. पा.पु.उपविभाग पांढरकवडा
१८. श्री. पी.एस. येंडे शा.अ. पा.पु.उपविभाग पांढरकवडा

१९. श्री. पी. एच. इंगोले क.अ. पा.पु.उपविभाग पांढरकवडा
२०. श्री. एम. पी. निरंजने प्रतिनिधी सा.व.वि यवतमाळ
२१. श्री. वंदना ढवळे निर्मल भारत अभियान
२२. श्री.महेंद्र गुल्हाणे निर्मल भारत अभियान
२३.श्री. भारत चव्हाण निर्मल भारत अभियान
२४.श्री. विनोद खोब्रागडे निर्मल भारत अभियान
२५.श्री. बी.ओ. पिंजरकर म.जी.प्रा. ना.व ग्रा. विभाग यवतमाळ
२६.श्री.आर. एस. अग्रवाल MSEDCL यवतमाळ
२७. श्री. टी. व्ही. कीरोलकर MSEDCL यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरुवात केली.

**विषय क्र. १ :- दिनांक २१/०४/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्र. १ :- दिनांक २१.०४.२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयाचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने खालील प्रमाणे सादर केला.

त्यानंतर सन्मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव मधील शिवनाळा, खंडणी, मेंढणी, रोहपट येथील योजने वरील विद्युत जोडणी बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी चे प्रतिनीधीने सदर योजनेला विद्युत जोडणी देणे करीता खर्च रु. सात लक्ष एवढा लागणार आहे अशी माहीती दिली होती. या बाबत कार्यवाही कुठपर्यंत करण्यात आली आहे अशी विचारणा केली. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी आमदार निधी मधुन निधी मिळणे बाबत संबंधित सन्मा जि.प. सदस्य यांचे सहाय्याने पाठपुरावा करणे बाबत कार्यकारी अभियंता पा.पु. यांना निर्देश दिले.

**विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी बाभुळगाव येथील पाण्याची टाकी कोसळली आहे या बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने पाण्याचे टाकीचे काम सुरु करण्यात आले होते परंतु मजुरांचे कमतरतेमुळे सदर काम बंद आहे, परंतु पुढील १५ दिवसामध्ये टाकीचे काम पुर्ण होईल असे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी बोरी (खु) ता. दारव्हा व ४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजने बाबत विचारणा केली असता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने मंडळ अमरावती यांचे मार्फत मु.अ. ठाणे यांचेकडे दिनांक ०५.०६.२०१२ नुसार सादर करण्यात आला तथापी उपस्थित मुद्यांची त्रुटी पुर्तते करीता परत करण्यात आला. पाणी आरक्षणाचा प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे सादर करण्यात आला आहे. पाणी आरक्षण मंजुरी अद्याप मिळालेली नाही. त्रुटीची पुर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करण्यात येत आहे असे सांगीतले. यावर मा. अध्यक्ष यांनी मागील ३ महीण्यापासुन नस्ती पेंन्डींग आहे आता पर्यंत का कार्यवाही करण्यात आली नाही अशी विचारणा केली व पुढील महीण्यात या बाबत आढावा देण्याचे आदेश दिले.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी शेंबाळपिंपरी ता.पुसद येथील पाणी पुरवठा योजने बाबत विचारण केली. यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने अधिक्षक अभियंता यांचे कडून तांत्रिक मान्यता मिळाली आहे. जिल्हा परिषद यवतमाळ कडून दि. ३१.०१.२०१४ चे जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. निविदा प्रपत्रे अ.अ. म.जी.प्रा. मंडळ अमरावती यांचेकडे दि.२४.०२.२०१४ ला सादर. १० % लोकवर्गणी भेरणेस्तव मान्यग्रामपंचायत ला विनंती करण्यात आली आहे, असे सांगीतले यावर मा. अध्यक्ष यांनी लवकरात लवकर कार्यवाही करणे बाबत निर्देश दिले.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे प्रतिनिधीने मौ. पांढूर्णा ता. यवतमाळ येथील मंजुर योजनेतील अस्तीत्वातील विहीरीचे खोलीकरण केल्या नंतर आवश्यक पाणी आवक उपलब्ध न झाल्याने भुजल खात्याच्या सल्ल्यानुसार नवीन ठिकाणी उदभव विहीरीचे काम घेण्यात आले त्यामुळे योजनेच्या उर्ध्वनलीका व इतर कामामध्ये बदल झाल्याने रु. २४.४७ लक्ष किंमतीच्या सुधारीत योजनेस खनिकर्म विभागाकडून मंजुरी प्राप्त झाली असुन या योजनेच्या

कामासाठी खनिकर्म विभागाकडून निधी मिळणे बंद झाले आहे. योजनेचा निधी मिळण्यासाठी कार्यालयाने खनिकर्म विभागाकडे पाठपुरावा केला आहे परंतु निधी अप्राप्त असल्याने योजनेची कामे अद्याप अपुर्ण आहे असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी सदर विषय D.P.C. मध्ये ठेवा असे निर्देश दिले.

त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील सभेस कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. हे आले पाहीजे असे निर्देश दिले.

त्यानंतर म.जी.प्रा. चे कोणत्याही भुमीपुजन व उदघाटना चे कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य तथा पदाधिकारी यांना बोलविण्यात येत नाही. या बाबत सर्व जि.प. सदस्य व पादाधिकारी यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली.

**विषय क्र. ४:- संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१३-१४ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे ३३०१९ एवढे उद्दीष्ट आहे. त्यापैकी APL चे २०२९२ व BPL चे १२७२७ एवढे उद्दीष्ट आहे. माहे मार्च २०१४ अखेर पर्यंत APL चे १४०५२ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे ६६३१ असे एकुण २०६८३ वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण ६३% काम पुर्ण झाले असल्याची माहीती दिली.

**विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ७१०८

२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ४६५२

३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - १२९९

४. कामे सुरु असलेल्या विहीरींचा संख्या - ३१०

५. पुर्ण झालेल्या विहीरींवरील झालेला एकूण खर्च - २०६८.२३

प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरी पैकी ३३५९ एवढया विहीरीची कामे अपुर्ण आहे असे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने सांगीतले यावर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी कीती विहीरींचे पमेन्ट अद्यापही देण्यात आलेले नाही अशी विचरणा केली असता, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने पुर्ण झालेल्या विहीरींपैकी ६६७ विहीरींचे पेमेन्ट देण्यात आलेले नाही असे सांगीतले.

त्यानंतर सन्मा. सदस्य श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव मधील कोणकोणत्या विहीरी आहेत व सदर विहीरी कोणाला देण्यात आल्या आहे या बाबत गटविकास अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांना कोणतीही माहीती नसते. तेव्हा या बाबत पुढील सभेच्या आधी माहीती पुरविण्यात यावी असे सांगीतले.

यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्ष यांनी पुढील सभेपर्यंत विहीरींची तालुका निहाय स्थितीची माहीती सादर करावी असे सांगीतले.

**विषय क्र. ६ :- पाणी पूरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत तालुका निहाय कामाची माहीती संबंधीत उपअभियंता यांनी खालील प्रमाणे सादर केली.

## सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखड्यामधील उद्दीष्ठीत ९५ गांवे व बिगर उद्दीष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ (Target ) | | २०१३-१४ (Non Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरू केलेली कामे | प्रस्तावित कामे | मंजुर कामे | |
| यवतमाळ | यवतमाळ | १६ | १६ | ५ | ४ | ३ |
| | आर्णी | १३ | १३ | ८ | ८ | ५ |
| | बाभुळगांव | ७ | ७ | ९ | ७ | ० |
| **एकुण** | | **३६** | **३६** | **२२** | **१७** | **८** |
| दारव्हा | दारव्हा | ९ | ९ | ७ | ४ | १ |
| | नेर | ३ | ३ | १० | ९ | ३ |
| **एकुण** | | **१२** | **१२** | **१७** | **१३** | **४** |
| पांढरकवढा | पांढरकवडा | २ | २ | ३ | १ | ० |
| | घाटंजी | ११ | ११ | ४ | १ | १ |
| **एकुण** | | **१३** | **१३** | **७** | **२** | **१** |
| राळेगांव | राळेगांव | १ | १ | ९ | ८ | ३ |
| | कळंब | ९ | ९ | १३ | ७ | २ |
| **एकुण** | | **१०** | **१०** | **२२** | **१२** | **५** |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | ० |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ३ |
| | उमरखेड | २ | २ | ० | ० | ० |
| | महागांव | ० | ० | २ | २ | ० |
| **एकुण** | | **६** | **६** | **७** | **६** | **३** |
| वणी | वणी | १ | १ | ४ | ० | ० |
| | मारेगांव | ११ | ११ | ३ | १ | ० |
| | झरी | ६ | १ | ० | ० | ० |
| **एकुण** | | **१८** | **१३** | **७** | **१** | **१** |
| **जिल्ह्याचे एकुण** | | ९५ | ९० | ८२ | ५१ | २२ |

त्यानंतर उपअभियंता यवतमाळ यांनी भारत निर्माण योजने अंतर्गत एकूण १६ कामांपैकी ७ योजनेचे कामांमध्ये अपहार झालेला असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्ष यांनी ४२ विंधन विहीरींची माहीती विचारली यावर उपअभियंता यांत्रिकी यांनी विंधन विहीरींचे एकूण ४७ प्रस्ताव मंजुरी करीता पाठविण्यात आले होते परंतु ४७ प्रस्तावापैकी २७ प्रस्तावांना मंजुरात मिळालेली आहे व दिनांक ०७.०५.२०१४ रोजी तश्या सुचना सुध्दा देण्यात आल्या आहे. उपअभियंता यांत्रिकी यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना बोअरची कामे टंचाई मधुन करण्यास सुचित केले आहे. यावर ज्या नळ योजना विशेष दुरुस्ती व ता. पु. न. योजनेची करारनामे झाली नसल्यास त्यांनी दिनांक १६.०५.२०१४ रोजी उपअभियंता / शाखा अभियंता यांनी सरपंच / सचिव यांचे सह उपस्थित राहुन तात्काळ करारनाम्याची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी असे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले. सभा आयोजीत करा व सदर सभेस सर्व उपअभियंता / शाखा अभियंता यांना संपुर्ण माहीती सह उपअस्थित राहुन करारनामा करुन घ्या असे निर्देश दिले.

**मा. अध्यक्ष, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्र.७:- मौजे आकपूरी, ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस मंजुरी मिळणे बाबत.**

मौजे आकपूरी ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे मुळ प्राकलन रु. ३२,८२,६००/- यांस कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी क्र. १२० दि. २२.०३.२०१२ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान आहे. मूळ योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०११-१२ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे. या योजनेचे विहिरीचे काम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात आले असता सदर विहिरीस अत्यल्प पाणी लागल्यामुळे सदर उद्भव खारीज करून उद्भवावरून योजना सुधारीत करण्याची आवश्यकता भासली सदर विहिरीचे कामावर रु. ६,४९,७७९/- एवढा खर्च झालेला आहे.

सदर योजनेचे उद्भवामध्ये बदल झाला असल्यामुळे त्याप्रमाणे सुधारीत योजनेमध्ये विहिरीवरील व उर्ध्वनलिकेवरील उपांगामध्ये वाढ झाली आहे. सन २०१२-१३ चे सुधारीत प्राकलनास म.जि.प्रा. विभागाचे प्रचलित दरसुचीप्रमाणे दर वापरून सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलनाची रक्कम रु. ३७,७४,१३०/- एवढी असून मूळ मंजुर प्राकलनावरील वाढ १४.९७% एवढी आहे. सुधारीत योजनेस कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, यवतमाळ यांनी क्र. २०४, दि. ३०.०१.२०१४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी सुरू असतांना या योजनांमधील उद्भव अयशस्त्री ठरल्याने दुसरा उद्भव घ्यावा लागल्यास किंवा साहीत्याचे भाववाढीमुळे किंवा वीज कनेक्शन पोटी केलेल्या तरतुदीत वाढ झाल्यामुळे योजनांच्या

किंमतीत वाढ झाल्यास योजनांची किंमत मूळ किंमतीपेक्षा १५ % पर्यंत वाढली तर अश्या स्वतंत्र / प्रादेशिक योजनांना मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहेत. परंतु सदरहु सुधारीत योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात असणे अनिवार्य आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात रु. ८०४ < रु. १७९० यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. २ :- मौजे आकपूरी ता. यवतमाळ येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे सुधारीत प्राकलनांस ही समिती मंजुरात प्रदान करते**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र. ८ :-मौजे बोदेगांव, ता. दारव्हा येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

मौजे बोदेगांव, ता. दारव्हा येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमच्या सन २०१३-१४ च्या वार्षीक कृती आराखड्यात समावेश असुन सदर योजनेचे प्राकलन रु. ९४,९२,७००/- यांस अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष, अमरावती यांनी क्र. भानिक / अम / तांशा / तांमं / ९० / २०१४, दि. ०७.०३.२०१४ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. योजनेस म.जि.प्रा. विभागाचे सन २०१३-१४ चे दरसुचीनुसार दर घेण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे शासन निर्णय क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र. १०४(अ)/पापु-०७, दि. १७ मार्च २०१०. प्रमाणे स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करतांना ज्या योजनेची प्राकलीत रक्कम रू. ५०,००,०००/- पेक्षा जास्त आहे अश्या स्वतंत्र / प्रादेशिक योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीला आहेत. परंतु सदरहु योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात असणे अनिवार्य आहे. प्रस्तूत योजना प्रचलित दरडोई खर्चाचे निकषात रु. १६३४ < रु. २३२७ यामध्ये बसत असल्याने प्रस्ताव मान्यतेस्तव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**ठराव क्र. ३ :- मौजे बोदेगांव, ता. दारव्हा येथील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे प्राकलनांस ही समिती प्रशासकीय मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.